पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११०१८
क्रीडा विभाग

**कृपया प्रसिद्धीसाठी**

दिनांक - ०८/७/२०१९

**विषय - शासकीय जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०१९-२० आयोजन व नियोजन अनुषंगाने दिनांक ११/७/२०१९ रोजीच्या सभेस उपस्थित राहणे बाबत...**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका व जिल्हा क्रीडा परिषद, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने, गतवर्षी प्रमाणे शासकीय जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०१९-२० या, माहे जुलै २०१९ पासून घेण्याचे निश्चित झाले आहे.

पिंपरी चिंचवड म.न.पा. गटाकरिता पिंपरी चिंचवड महानगरपालिका व जिल्हा क्रीडा परिषद, पुणे यांचे मार्फत गुरूवार दिनांक ११/०७/२०१९ रोजी सकाळी ११.०० ते ४.०० या वेळात प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड ४११०१९ येथे शासकीय जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०१९-२० चे आयोजन व नियोजना संबंधी चर्चा करण्यात येणार आहे.

सन २०१९-२० या वर्षीसुद्धा मागील वर्षाप्रमाणे सर्व खेळांच्या प्रवेशिका ऑनलाईन स्विकारल्या जाणार असुन खेळाडूंची नोंदणी, प्रवेशिका नोंदणी या बाबत मार्गदर्शन केले जाणार आहे, तसेच स्पर्धा आयोजन स्थळा संबंधीही चर्चा होणार आहे. म.न.पा. शाळा व्यतिरिक्त, खाजगी शाळा (संस्था) विविध खेळांच्या शासकीय जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यास इच्छुक असल्यास, त्याबाबतची पत्रेही या सभेत स्विकारली जाणार आहेत. शासनाने प्रत्येक शाळेस, किमान २ सांघिक खेळामध्ये व एका वैयक्तिक खेळामध्ये सहभागी होण्याचे सक्तीचे केले असल्यामुळे, शाळा प्रमुखांनी आपले शाळा मधील जास्तीत जास्त संघ सहभागी करावेत.

सर्व म.न.पा.शाळांच्या सर्व प्राथमिक/माध्यमिक व खाजगी प्राथमिक/माध्यमिक मुख्याध्यापकांनी एक क्रीडा शिक्षक (शारीरिक शिक्षण) व संगणक ऑपरेटर यांना गुरूवार दिनांक ११/०७/२०१९ रोजी सकाळी ११.०० ते ४.०० या वेळात प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड ४११०१९ येथे शासकीय जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०१९-२० चे आयोजन नियोजन सभेस उपस्थित राहणेबाबत आदेश द्यावेत.

तरी म.न.पा. परिसरातील सर्व म.न.पा. व खाजगी शाळेतील प्राथमिक, माध्यमिक विद्यालयातील क्रीडा शिक्षक व संगणक ऑपरेटर यांनी **गुरूवार दिनांक ११/०७/२०१९ रोजी सकाळी ११.०० ते ४.०० या वेळात प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड ४११०१९** येथे आयोजित केलेल्या शासकीय जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०१९-२० आयोजन व नियोजना बाबतच्या सभेस अवश्य उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

**(आशा राऊत )**
**सहाय्यक आयुक्त,क्रीडा**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी ४११०१८**